# मे. ऑरसन रेझिन आणि कोटींग्ज प्रा.लि., गट नं. ३९८/१ आणि २, ४५९/१, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर या कंपनीचे प्रस्तावित कृत्रिम सेंद्रिय रसायन निर्मिती प्रकल्पाच्या विस्तारीकरणाविषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त

केंद्रीय वने, पर्यावरण व हवामान बदल विभाग, भारत सरकार यांचे पर्यावरण आघात मूल्यांकन (इ.आय.ए.) अधिसूचना २००६, दि. १४/०९/२००६ आणि आतापर्यंत सुधारित अधिसूचनेच्या तरतुदीनुसार मे.ऑरसन रेसिन्स आणि कोटींग्ज प्रा.लि., गट नं. ३९८/१ आणि २, ४५९/१, दिनकरपाडा, कुडस, ता. वाडा, जि. पालघर, महाराष्ट्र यांचे प्रस्तावित "सिंथेटिक ऑरगॅनीक केमिकल्स मॅन्युफॅक्चरींग युनिट (एकूण उत्पादन क्षमता ७०० टन/महिना वरुन ७००० टन/ महिना) आणि अन्सॅच्युरेटेड पॉलिस्टर रेझिन (मिश्रण आणि मिसळणे व एकरुप करुन) १५६५ टन/महिना उत्पादन प्रकल्पाचे विस्तारीकरणाबाबत" पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीसाठी दि. ०४.१२.२०२५ रोजी मुख्यालयास अर्ज प्राप्त झाला होता. मा. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) मप्रनि, मुंबई यांचे पत्र क्र.BO/JD(WPC)/PH/B-260318-FTS-0188, दि. १८.०३.२०२६ अन्वये उप-प्रादेशिक कार्यालय कल्याण-३ या कार्यालयास पर्यावरण विषयक जाहीर पुर्नजनसुनावणी घेण्याचे आदेश देण्यात आले होते. सदर प्रकल्पाचे प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांच्या पॅनेलची नियुक्ती करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १) | **अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर**<br>किंवा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दर्जाच्या कमी नाही असे त्यांचा प्रतिनिधी | **अध्यक्ष** |
| २) | **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी**<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण | **सदस्य** |
| ३) | **उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३** | **संयोजक** |

सदर निर्देशानुसार मा.जिल्हाधिकारी, पालघर यांच्या मान्यतेने जाहीर जनसुनावणीचे अध्यक्ष मा.श्री.सुभाष भागडे, अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. मे.ऑरसन रेझिन आणि कोटींग्ज प्रा.लि., गट नं. ३९८/१ आणि २, ४५९/१, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर येथे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीची जाहीर सूचना सुनावणीच्या एक महिना आधी दिनांक ०७.०३.२०२६ रोजी मराठी दै. सकाळ व इंग्रजी दैनिक द फ्री प्रेस जर्नल या वर्तमानपत्रामध्ये जाहीर सूचना प्रकाशित करण्यात आली होती. पर्यावरण आघात मुल्यांकनाचा अहवाल व कार्यकारी सारांश यांच्या प्रती मराठी व इंग्रजी भाषेमध्ये खालील ठिकाणी सर्वांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आले होते.

१. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा माळा, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, दक्षिण मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, तिसरा मजला, शिव (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.
४. मा.जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर जिल्हा
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर
६. उप विभागीय अधिकारी, ता. वाडा, जि. पालघर
७. प्रादेशिक अधिकारी कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण

८. तहसिलदार, वाडा तहसिल कार्यालय, जि. पालघर
९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती वाडा, ता. वाडा, जि. पालघर
१०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर, जि. पालघर
११. ग्रामपंचायत कार्यालये-दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर

तसेच वर्तमानपत्रातील जाहीर सूचनेद्वारे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचा मुळ उद्देश, प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस सदर प्रकल्पाविषयी माहिती, प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा यांची माहिती सामान्य जनतेस देणे, त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे, याबाबबत परिसरातील नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ यांनी प्रकल्पाबाबत आक्षेप, सूचना लेखी अथवा तोंडी स्वरुपात अथवा ई-मेलद्वारे कळवाव्यात असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकल्पाबाबत प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, कल्याण येथे २ सूचना ई-मेलद्वारे प्राप्त झाल्या होत्या. (प्रत सोबत). तसेच जनसुनावणीदरम्यान प्राप्त होणाऱ्या सूचना/ हरकती यांचीही नोंद घेण्यात येणार आहे.

मे.ऑरसन रेसिन्स आणि कोटींग्ज प्रा.लि., या उद्योगाचे पर्यावरण विषयक जनसुनावणी मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांच्या उपस्थितीत दि. १०.०४.२०२६ रोजी सकाळी ११.१७ वा. सुरु करण्यात आली. सदर सुनावणीस लोकप्रतिनिधी, उद्योगाचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, वृत्तपत्र/ वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी व परिसरातील सामान्य नागरीक असे एकूण ८७ प्रतिनिधी उपस्थित होते, याबाबतची यादी सोबत जोडलेली आहे. तसेच या जनसुनावणीस खालील अधिकारी उपस्थित होते.

**१. मा.श्री.सुभाष भागडे, अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर**
**२. श्री. जयवंत हजारे, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण**
**३. डॉ. सीमा उदय दळवी, संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३**

संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांच्या परवानगीने जनसुनावणीबाबत प्रस्तावना सादर केली प्रस्तावणे दरम्यान पर्यावरण विषयक जाहीर जनसुणावणीचा उद्देश व कार्यपध्दती सांगण्यात आली. प्रथम प्रकल्प प्रवर्तक प्रकल्पाबाबत माहीती देतील त्यानंतर नागरीक आपले आक्षेप, तक्रार वा पाठींबा देऊ शकतात. प्रश्न विचारताना आपले नाव व गाव सांगणेबाबत सुचित केले आणि प्रकल्प प्रवर्तकास प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक तांत्रिक बाबींसंदर्भात पॉवरपॉईंटचे सादरीकरण करण्यास विनंती केली. तसेच ही पर्यावरण विषयक जनसुनावणी असल्याने पर्यावरण विषयक प्रश्न विचारण्यात यावे असेही विनंती केली.

त्यानुसार प्रकल्प प्रवर्तक मे. सडेकर एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि. यांचेकडून मे.ऑरसन रेसिन्स आणि कोटींग्ज प्रा.लि., गट नं. ३९८/१ आणि २, ४५९/१, दिनकरपाडा, कुडस, ता. वाडा, जि. पालघर यांचे प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाचे पॉवरपॉईंट (पी.पी.टी.) सादरीकरणासह तपशिलवार माहिती सर्वांच्या निदर्शनास आणून दिली.

तद्नंतर मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, कंपनीच्या प्रकल्प प्रवर्तकाने तपशिलवार सादरीकरण केले असून यापूर्वी ग्राम पंचायत कार्यालयास सादर केलेला प्रकल्प अहवालाचा कार्यकारी सारांशाचे सर्व उपस्थित नागरिकांडून वाचन केले असे मी समजतो असे म्हटले. सदर सारांश आणि कंपनीने दिलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्पाबाबत कोणाला काही सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करावयाचे असतील तर त्यांनी मांडण्यासाठी मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांच्याकडून आवाहन करण्यात आले. तसेच जनसुनावणी दरम्यान लेखी सूचना द्यावयाच्या असतील तर म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीकडे दाखल करण्यास सांगितले.

त्यानुसार खालीलप्रमाणे उपस्थितांकडून सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करण्यात आले व त्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकाने सविस्तर अभिप्राय दिले :-

१) **श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**
गेल्या महिन्यात २४.०२.२०२६ रोजी जनसुनावणी आयोजित केली होती. माझं घर १०० मिटरवर आहे. कंपनीमध्ये यापूर्वी स्फोट झाला होता, कंपनीला आग लावली होती. त्या सुनावणीसाठी बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते, त्यावेळी सुनावणी ५ मिनिटात सुरु होण्याआधी कंपनी व्यवस्थापनाने संबंधित विषयाचे अधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे ही सुनावणी रद्द करण्यात येईल व पुढील सुनावणी त्यांच्या वेळेनुसार लावण्यात येईल कळविले होते. तेंव्हा ही जनसुनावणी असल्यामुळे ती सार्वजनिक ठिकाणी व्हावा असा ठराव पारीत केला, तरी सुध्दा ही जनसुनावणी या ठिकाणी का लावण्यात आला याचा खुलासा देण्यात यावा.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी त्यावेळी राज्य विधी मंडळाचे अधिवेशन सुरु होते तसेच आयत्या वेळी वरिष्ठांचे आदेश पाळावे लागल्यामुळे आणि कार्यालयीन अपरिहार्य कारणामुळे आम्ही उपस्थित राहू शकलो नाही असे सांगितले. त्यावेळी जेवढे ग्रामस्थ उपस्थित राहिले होते त्यांची मी मनापासून क्षमा मागते असे म्हटले. परंतु पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ आणि आतापर्यंत सुधारित अधिसूचनेनुसार पर्यावरण विषयक जनसुनावणी ही प्रकल्पाच्या आवारात अथवा किमान अंतरावर घेणे आवश्यक असते, जेणेकरुन तेथे काय परिस्थिती आहे हे लक्षात यावे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि उद्योग, सामान्य जनता यांचे समन्वयक म्हणून काम करते. यामध्ये लोकांच्या सूचना, हरकती, आक्षेप, अपेक्षा यांची नोंद इतिवृत्तामध्ये घेऊन इतिवृत्त पुढील कार्यवाहीस्तव पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठविली जाते आणि त्यांच्याकडून उद्योगांना पर्यावरण अनुमती देण्यात येते असे म्हटले. तसेच पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसुचनेनुसार सर्व नियमांचे पालन करुन, ३० दिवसांची मुदत देऊन पुन्हा सर्व संबंधित विभागांना पत्राद्वारे कळवून ही जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे असे नमूद केले.

२) **श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**
याबाबत आमची काही शंका नाही. परंतु कंपनी व्यवस्थापनाकडून आम्हाला ५ मिनिटात संबंधित अधिकारी पोहेचतील अशी माहिती मिळते व १५ मिनिटानंतर संबंधित अधिकारी येऊ शकत नाही हे कस काय? पुन्हा कंपनीकडून आम्हाला माहिती मिळते की एका तासात अधिकारी येतात याचा काय असे विचारले. ही जनसुनावणी कंपनीसाठी आहे की जनतेसाठी हे सांगावे असे म्हटले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी त्यावेळी मी इथे हजर नसल्यामुळे काय संभाषण झाले याबाबत मी काही माहिती देऊ शकत नाही.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, त्यावेळेस अधिवेशन असल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून ब्रीफींगसाठी अचानक बोलाविल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत. त्यावेळी मी स्वत:देखील १ तास वाट बघितली आणि साधारण दुपारी ०१.०० च्या दरम्यान जनसुनावणी रद्द झाल्याची घोषणा केली. एखादी सुनावणी झाली नाही तर पुन्हा नव्याने सुनावणी आयोजित केली जाते. त्यामुळे आणखी उप प्रश्न घेऊ नयेत सांगून प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक ज्या तुमच्या हरकती आहेत त्या मांडावेत असे म्हटले. तसेच वाढवण बंदराच्या सुनावणीदरम्यान प्रकल्पाच्या ठिकाणाहून दूसऱ्या ठिकाणी का आयोजित करण्यात आली अशी हरकत प्राप्त झाली होती व प्रकल्पापासून २० कि.मी. अंतरावर होतं मा.कोर्टाने ती मान्य केली होती.

३) **श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**
मा. अध्यक्ष महोदय, दि. २४.०२.२०२६ रोजी लावलेल्या जनसुनावणीबाबत आमच्या ग्राम पंचायत कार्यालयाने पत्रव्यवहार केला, त्यावेळेस आम्हाला "या कार्यालयास आपला अर्ज प्राप्त झाला आहे, त्यामध्ये मे. ऑरसन

रेसिन्स आणि कोटींग्ज प्रा.लि., गट नं. ३९८/१ आणि २, ४५९/१, दिनकर पाडा, कुडुस, ता. वाडा,जि. पालघर येथे प्रस्तावित प्रकल्पास उत्पादन क्षमता ७०० टन/महिना वरुन ७००० टन/महिना वाढवून अन्सॅच्युरेटेड पॉलिस्टर रेझिन (मिश्रण आणि मिसळणे व एकरुप करणे) १५६५ टन/ महिना उत्पादन प्रकल्पाच्या विस्तारीकरणाबाबत केंद्र शासनाच्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ नुसार दिनांक २४.०२.२०२६ रोजी दुपारी १२.००वा. आयोजित केली होती. सदरची सुनावणी ग्रुप ग्रामपंचायत कोंढले-म्हसवळ ता. वाडा येथे घेण्यात यावी, कंपनीच्या आवारात सुनावणी घेतली तर संकोच अथवा दडपण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच गावातील एक मध्यवर्ती ठिकाण असून जास्तीत जास्त ग्रामस्थांना सुनावणीस उपस्थित राहून हरकती मांडणे सोईचे होईल असे नमूद आहे. सदर बाबत आपणास कळविण्यात येते की, दि. २४.०२.२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या जनसुनावणीची जाहीर सूचना दि. १६.०१.२०२६ रोजी मराठी वृत्तपत्र दै. सकाळी आणि इंग्रजी वृत्तपत्र द फ्री प्रेस जर्नल यामध्ये प्रसिध्द करण्यात आले असून त्यामध्ये मे. ऑरसन रेसिन्स आणि कोटीग्ज प्रा.लि. या कंपनीचे ठिकाण देण्यात आलेले आहे त्या ठिकाणी उपस्थित राहण्यास कळविण्यात आलेले आहे." असे उत्तर मिळालं होतं. पण किमान दिड महिना आधी आम्ही ग्रामस्थांनी सार्वजनिक ठिकाणी सुनावणी मागणी करण्यात आली होती असे सांगितले.

मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, तुमची मागणी असू शकते, परंतु म.प्र.नि.मंडळाला जनसुनावणी प्रकल्पाच्या जागेवर किंवा २ मिटरच्या आतील ठिकाणी प्रकल्पाच्या आवारात घेतली आहे येथे काही दडपण नाही, तुम्हाला काही सांगावयाचे असल्यास सांगू शकता. लिखित स्वरुपात दिलेल्या सुचना देखील या सुनावणीच्या इतिवृत्ताचा भाग असतील आणि तोंडी सांगितले तरी त्याचा व्हिडीओ रेकॉर्डींग करुन घेतले जाईल असे सांगून कोणालाही आपले मत अथवा सूचना मांडता येईल असे म्हटले.

**४) श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

हा प्रकल्प रासायनिक असल्यामुळे मोठ्या प्रमाणात हवा, माती आणि जल प्रदूषण होण्याची शक्यता असल्यामुळे दक्षिणेकडील नदीच्या दिशेला असलेल्या भात शेतीमध्ये पावसाळ्यात प्रदूषित पाणी येऊन त्या पिकाची नासाडी कशी होते याची फोटो दाखविले आणि याबाबत यापूर्वीही पत्रव्यवहार केला होता. तरीदेखील आमच्या पत्रव्यवहाराची कोणीही दखल घेतलेली नाही.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, तुम्ही वारंवार तक्रारी करुनही दखल घेतली नाही, फोटो अथवा रेकॉर्डींग सुध्दा तुम्ही जमा करु शकता त्याची इतिवृतामध्ये समावेश करण्यात येईल.

**५) श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

एखाद्या शेतकऱ्याचे वैयक्तिक नुकसान झाल्यास तो जर कपंनीच्या गेटवर तक्रार करण्यास गेला तर, त्यालासुध्दा अरेरावी झाल्याची घटना आमच्याकडे आहे, त्याला कंपनी मालकांनी स्पष्ट पणे इथे नको, तु जिल्हाधिकारी यांना तक्रार कर असे सांगितले असल्याचे म्हटले.

**६) श्री. जयेश चंद्रकांत सांगवी, दिनकर पाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

माझा गट नं. ४४१ असून सन २०२२ मध्ये अर्ज घेऊन आलो असता, कंपनीचे मालकांकडून सांगितले की, तुम्ही काही केला तरी आमचं कोणीही काही वाकडं करु शकत नाही असे म्हटले.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी याची नोंद करुन घेतली जाईल असे सांगितले.

**७) श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

अध्यक्ष महोदय, आज होणाऱ्या जनसुनावणी झाल्यानंतर त्याच्या इतिवृत्ताची प्रत आम्हाला आताच मिळायला पाहिजे असे म्हटले. प्रारुप इतिवृत्त असेल तरीही ते आम्हाला देण्यात यावे आणि जेंव्हा अंतिम इतिवृत्त होईल तेंव्हा ती उपलब्ध करुन द्यावी असे म्हटले.

मा. अध्यक्ष तथापि अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी इतिवृत्ताची प्रत आता देता येणार नाही, इतिवृत्त तयार व्हायला वेळ लागेल आणि अंतिम इतिवृत्त तयार झाल्यावर ती म.प्र.नि.मंडळाच्या वेब साईटवर उपलब्ध होईल व एक प्रत ग्राम पंचायत कार्यालयास पाठविण्यात येईल. इतिवृत्ताची प्रत लगेच द्या वगैरे या सुनावणीचा भाग होऊ शकत नाही, पर्यावरण विषयक काही विषय असतील तर ते मांडावेत असे म्हटले. या सुनावणीचे व्हिडीओ रेकॉर्डींग होणार आहे, २ इ-मेल आणि आपण मांडलेले विषय इतिवृत्तामध्ये समाविष्ट होणार आहेत असे सांगितले.

**८) श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

या जनसुनावणीच्या आधी दि.०२.०२.२०२६ रोजी झालेल्या ग्रामसभेत ठराव पास केलेला असून त्याची प्रत दि.२०.०२.२०२६ रोजी पोस्टाद्वारे डॉ. सीमा दळवी, संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी-३ यांना पाठविण्यात आलेला आहे.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी त्याची नोंद आधीच करण्यात आली आहे असे सांगितले.

**९) श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

आमच्या गावात आधीच पाणीटंचाई आहे आणि केमिकलयुक्त सांडपाणी भूजलामध्ये मिळण्याची धोका आहे.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ याबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर द्यावे असे सांगितले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी म्हटले की, कंपनीकडून वापरलेली पाण्याची पूर्ण प्रक्रिया करण्यात येईल आणि कंपनीकडून एक थेंबसुध्दा पाणी कंपनीच्या आवाराबाहेर जाणार नाही याची पूर्ण काळजी घेण्यात येईल.

**१०) श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

आमच्या गावातील गृहिणीने बोअरवेलचे पाणी एका हंड्यात भरुन आणले आहे ते सगळेजण पाहू शकता असे म्हटले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी या तक्रारीची नोंद घेतली आहे असे सांगून भुजल प्रदूषणाबाबत भूजल विभागामार्फत सर्वेक्षण करण्यास कळविण्यात येईल असे म्हटले.

**११) श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

हा रासायनिक उद्योग असल्यामुळे आग, स्फोटाची मोठी घटना होऊ शकते याचे दुष्परिणाम ग्रामपंचायत वाल्यांनी भोगलेले आहे, भयानक आग लागल्यानंतर सर्वांना सैरावैरा धावावे लागते अशा वेळेस ग्रामपंचायतीकडून या कंपनीला २ ते ३ दिवस कंपनी थांबवा असे सांगितले असता, त्यांनी ग्रामपंचायतीवर खोट्या केसेस टाकल्या आहेत.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी आग व स्फोट ही बाब औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य विभाग यांच्या अंतर्गत विषय असून पर्यावरणविषयक प्रश्न असतील तर ते उपस्थित करावे अशी पुन्हा विनंती केली.

**१२) श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

- कंपनीची सध्या ७०० टन/महिना उत्पादन क्षमता असतांना ग्रामस्थ इतके आरडाओरडा करत आहोत तर उत्पादन क्षमता ७००० टन/महिना झाली तर काय परिस्थिती असेल याचा विचार व्हावा असे म्हटले.

...६

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण -३ यांनी याबाबत प्रकल्प प्रवर्तकांना उत्तर देण्यास सांगितले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, सदर प्रकल्पामध्ये हवेचे, पाण्याचे व जमिनीचे प्रदूषण होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली गेली आहे तसेच प्रकल्पाच्या विस्तारीकरणानंतर देखील प्रदूषण होणार नाही याची त्या पटीने काळजी घेतली जाईल.

१३) **श्री. जयेंद्र सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर:**

आता ७०० टन/महिना उत्पादन सुरु आहे तर त्याला ७००० टन / महिना उत्पादन वाढवण्याची परवानगी देऊच नये असे मत व्यक्त केले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण- ३ यांनी आपल्या आक्षेपाची नोंद घेण्यात आली असल्याचे सांगून इतरही लोकांना बोलण्याची संधी द्यावी अशी विनंती केली.

१४) **श्री. संदिप मधुकर भेरे, रा. दिनकरवाडी, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

सध्या ही जी कंपनी आहे ती एम.एस.एम.ई अधिसूचनेप्रमाणे लघु उद्योग, मध्यम उद्योग किंवा मोठा उद्योग? मध्यम उद्योग असेल तर हा केमिकल उद्योग गावापासून साधारण किती अंतरावर कंपनी असावी? मध्यम उद्योगासाठी २.५ कि.मी. लांब असावं आणि मोठया उद्योगासाठी ३ कि.मी. गावापासून अंतरावर असावं, पण या कपंनीपासून गाव १ कि.मी. अंतरावर आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी मध्यम उद्योग आहे असे सांगितले. त्यासंदर्भात तशी काही अधिसूचना नाही आहे.

मा.अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, ही एम.आय.डी.सी. एरिया आहे ती मंत्रालयाकडून घोषित केली जाते. त्यामुळे हा मध्यम उद्योग असून गावापासून १ कि.मी. च्या आत आहे हा आपला विषय इतिवृत्तामध्ये घेतली जाईल असे सांगून एका वक्त्याने मांडलेला विषय दूसऱ्या वक्त्याकडून पुन्हा मांडू नये अशी विनंती केली.

१५) **श्री. दिपेश पष्टे, रा. कुडुस, ता. वाडा, जि. पालघर** :

इ.आय.ए. चा सर्व्हे ऑक्टोबर, २०२४ ते डिसेंबर, २०२४ या कालवधीत झालेला आता एप्रिल, २०२६ सुरु आहे, दोन वर्षानंतर सुनावणी आलेली आहे, जे सध्या प्रदूषण आहे ते २ वर्षापर्यंत तेवढच आहे काय? हा सर्व्हे पुन्हा करायला हवा होता कि नाही? या संदर्भात म.प्र.नि.मंडळास काही पर्यावरण समित्यांचे पत्र सुध्दा आलेले आहेत. आपण ज्या परिसरात सुनावणीस बसलेलो आहोत सर्व ग्रामस्थ, कंपनीचे प्रतिनिधी, मा.अपर जिल्हाधिकारी व म.प्र.नि.मंडळाचे अधिकारी यांना इथे कसलीही दुर्गंधी येत नाही का? केमिकलचा वास येत नाही काय? ग्रामपंचायतीमध्ये जनसुनावणी घ्यावयाचे असेल तर कंपनीने ग्रामपंचायतीला विचारायला हवे होते की, जनसुनावणीसाठी कोठे हॉल उपलब्ध आहे का? ३३ टक्के हरित पट्टा पाहिजे तर सी.एस.आर. नुसार एवढ्या वर्षात फक्त ५० झाडे लावले? माझ बरोबर आहे की चूक हे सांगावे असे म्हटले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी आपण बरोबर आहात असे सांगून प्रकल्प प्रवर्तकाने याचे उत्तर द्यावे असे सांगितले.

१६) **श्री. दिपेश पष्टे, रा. कुडुस, ता. वाडा, जि. पालघर** :

एका नागिरकांनी सांगितले की आता ७०० टन/महिना वरुन ७००० टन/महिना उत्पादन सुरु करणार आहे, दूसऱ्या नागरिकांनी सांगितले की २०२२ पासून काम करतो आहे आणि मी सुध्दा २०१८ पासून येथे काम करीत असून बऱ्याच कंपन्यांचे एन.सी. आहेत, या कंपन्याच्या आतमध्ये आणि या कंपन्यांच्या बाहेर दुर्गंधी येतो, ज्या

...७

एन.सी. केल्या होत्या त्याचा पाठपुरावाच नाही, म.प्र.नि.मंडळाकडे आम्ही फोटो पाठवितो, व्हिडीओ पाठवितो, व्हिडीओ कॉल करतो ते उचलले जात नाही तेंव्हा आम्ही काय करायचे काहीच उत्तर नाही. सन २०२४ ला शेताचे सर्व्हे करण्यात आले आहे तेंव्हा स्थानिक शेतकऱ्याला विचारले आहे काय? शेतामध्ये ऑईल येतंय, प्रदूषित पाणी येतंय ते कुठुन येतं? शेतकऱ्यांच्या जमिनी नापिक होतात. अन्सॅच्युरेटेड पॉलिस्टर रेझिनची निर्मिती होणार आहे ते घातक केमिकल आहे, त्यामुळे १० कि.मी. च्या शासकीय हॉस्पिटलमध्ये गेल्यावर अस्थमा, श्वसनाचे त्रास होणे, चक्कर येण असे आजार नागरिकांना भेडसावतात. तरीही म.प्र.नि. मंडळाकडून मागच्या जनसुनावणीमध्ये

रेकॉर्डनुसार जनतेला कोणतेही त्रास होत नाही असे सांगितलं होतं आणि दळवी मॅडम तिथे उपस्थित होत्या असे म्हटले. कंपनी ७०० टन/महिना वरुन

७००० टन/महिना उत्पादन वाढवणार असून यांच्याकडील सध्याचा इ.टी.पी. १० पटीने मोठा करावा लागेल ते कंपनीकडून होणार आहे काय? सध्या सगळयांनाच वास येतोय यावर जर तुमच्याकडं उत्तरं असतील तर ते तुम्ही देऊ शकता.

प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री. पष्टे यांच्या सर्व प्रश्नांचं निरसन करण्याचा प्रयत्न करतो असे सांगितले. पहिला मुद्दा बेसलाईन सर्व्हेचा तो ई.आय.ए.अधिसूचनेनुसार ३ वर्षांकरीता वैध असतो. दूसरी गोष्ट झाडांबाबत कंपनीकडून ५० झाडं नाही तर एकूण ४३१ झाडं लावली गेली व पुढील १ ते २ वर्षामध्ये आणखी ४५९ झाडं लावण्यात येतील. कंपनीतील वासाबाबत सांगायचं झाल्यास कंपनीच्या चारही बाजूला इतर कंपन्या आहेत तसेच ये-जा करणाऱ्या वाहनामुळेही वास येण्याची शक्यता आहे. या कंपनीतून अतिशय घातक आणि वास येणाऱ्या केमिकलचा वापर होणार नाही. जलप्रदूषणाबाबत सांगायचे झाल्यास कंपनीमध्ये रिॲक्टर वाशिंगला पाणी लागतं आणि उत्पादन बदलाच्या प्रक्रियेत पाणी लागत नाही. तरीही कंपनी शुन्य द्रव निस्सारण वर आधारित असल्यामुळे कंपनीबाहेर एकही थेंब पाणी जाणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

१७) **श्री. दिपेश पष्टे, रा. कुडुस, ता. वाडा, जि. पालघर** :

प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, या कंपनीत घातक रसायन नाही आणि अनसॅच्युरेटेड पॉलिस्टर रेझिन हे घातक रसायन आहे. तसेच कंपनी व्यवस्थापन जनसुनावणीत सांगत आहे की, अनसॅच्युरेटेड पॉलिस्टर रेझिन हे घातक रसायन नाही हा मुद्याची नोंद करुन ठेवण्यात यावी असे म्हटले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी बोलताना थोडंफार मागे पुढे होऊ शकते असे म्हणून अनसॅच्युरेटेड पॉलिस्टर रेझिन तयार करण्यासाठी कच्चा माल वापरला जातो ते घातक रसायन असल्याचे सांगितले. तसेच सदर रसायनाच्या विशेष स्टोरोजची योग्य व्यवस्था करण्यात येते व त्याकरीता पेसोची लायसन्स घ्यावे लागते असे सांगितले.

१८) **श्री. दिपेश पष्टे, रा. कुडुस, ता. वाडा, जि. पालघर** :

जनसुनावणीमध्ये समन्वयक म्हणून आलात कि त्यांची बाजू मांडायला आले आहेत असे संयोजक यांना प्रश्न केला. तसेच जनसुनावणीमध्ये कंपनीकडून चुकीची माहिती सादर करण्यात येत असल्याचे सिध्द झाले आहे असे नमूद केले. नुसती नोंद घेणार काय याच्यावर काही कारवाई होणार किंवा नाही असे विचारले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी सन २०२३ मध्ये रुजू झाले असून तेंव्हापासून आता जनसुनावणी लागेपर्यंत माझ्या कडे या कंपनीची एकही तक्रार प्राप्त झालेली नाही असे नमूद केले. तसेच प्रकल्पधारकांनी किती झाडे लावलेले आहेत याबाबत एक विशेष भेटीचे आयोजन करुन ग्रामस्थांना याची माहिती द्यावी ही विनंती.

१९) **श्री.नितीन मोकाशी, ग्रामपंचायत अभिवणे, ता. वाडा, जि. पालघर** :

आमच्याकडे २६ जानेवारी, २०२६ रोजी ग्राम सभा झाली त्या सभेमध्ये १० ते १२ जणांचे लेखी स्वरुपात आलेले

अर्ज आपल्या कडे सुपुर्द करतो असे म्हटले. जे पण ग्रामस्थांनी सांगितले की, ७०० टन/महिना वरुन ७०००टन/महिना विस्तारीकरणाच्या प्रकल्पाला स्थानिकांना त्रास होणे थांबत नाही तोपर्यंत म.प्र.नि.मंडळाने अथवा कोणत्याही सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर देण्यात येऊ नये असे मत व्यक्त केले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी सदर अर्जाची नोंद इतिवृत्तात घेण्यात येईल असे सांगितले. तसेच ही परवानगी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, यांचेकडून देण्यात येते, म.प्र.नि.मंडळ फक्त समन्वयक म्हणून या सुनावणीचे इतिवृत्त तयार करुन ते सक्षम प्राधिकारी यांचेकडे पाठविली जाते असे नमूद केले.

२०) **श्री.नितीन मोकाशी, ग्रामपंचायत अभिवणे, ता. वाडा, जि. पालघर** :

मॅडम आपण म.प्र.नि.मंडळाच्या उप प्रादेशिक अधिकारी आहात आणि म.प्र.नि.मंडळाकडून कंपन्यांना परवानगी देण्यात येत नाही म्हणून सांगता, परंतु या परिसरात बऱ्याच कंपन्या आल्या त्यांना म.प्र.नि. मंडळाकडून परवानग्या देण्यात आल्या आहेत.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी पुन्हा स्पष्ट केले की, ही सुनावणी पर्यावरणीय अनुमतीसाठी घेतली जाते व याची परवानगी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून देण्यात येते. तथापि म.प्र.नि.मंडळाकडून कन्सेंट टू इस्टॅब्लिश आणि कन्सेंट टू ऑपरेट या परवानग्या देण्यात येतात आणि या परवानग्या आणि पर्यावरणीय अनुमती या दोन स्वतंत्र परवानग्या आहे असे नमूद केले.

मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, ग्रामस्थांकडून दोन विषय एकत्र केल्यामुळे गोंधळ होतोय. पर्यावरणीय अनुमतीसाठी जनसुनावणीची कार्यपध्दती पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ अन्वये एका महिन्याआधी प्रसिध्द केल्यानुसार त्या ठरलेल्या ठिकाणी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेला सुनावणी घेतली जाते, सुनावणीमध्ये उपस्थित झालेल्या सुचना, हरकती, आक्षेप, अपेक्षा यांची इतिवृत्तामध्ये नोंद घेऊन अंतिम इतिवृत्त सक्षम प्राधिकारी यांचेकडे पाठविली जाते. छोट्या प्रकल्पांसाठी राज्य सरकार सक्षम प्राधिकारी आहे तसेच मोठे प्रकल्पासाठी केंद्र सरकार सक्षम प्राधिकारी आहे. आता नियमित तक्रारी ज्या काही असतील त्यावर म.प्र.नि.मंडळामार्फत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. इतिवृत्ताची एक प्रत ग्रामपंचायतीला उपलब्ध करुन देण्यात येईल.

२१) **श्री.अभिमन्यु चौधरी, दिनकरपाडा, ता. वाडा, जि. पालघर** :

आता ७०० टन/महिना उत्पादन आहे आणि विस्तारीकरणानंतर ७०००/महिना होणार आहे त्यामुळे आमच्या शेतीला कोणतेही प्रकारचं नुकसान होणार नाही हे कंपनी सिध्द करु शकतात काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, कंपनीचे विस्तारीकरण करण्यापूर्वी पाण्याचे संपूर्ण नियोजन करुन पाणी वापल्यानंतर इ.टी.पी मध्ये प्रक्रिया केल्यानंतरच ते कुलींग टॉवर, बॉयलरसाठी किंवा प्रोसेसमध्ये वापरण्यात येईल. त्यामुळे पाणी बाहेर सोडण्याचा प्रश्न नाही. तसेच धुराचे परिणाम कमी करण्यासाठी ३० मिटरची चिमणी लावण्यात येईल त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीला काही नुकसान होणार नाही.

२२) **श्री. श्रीराम दशरथ विसे, रा. दिनकरपाडा, ता. वाडा, जि. पालघर** :

या कंपनीमधील टँकरमध्ये १०-१०, २०-२० टन रेझिन बनते, रेझिनमध्ये किती घातक उत्पादन मिसळल्या जातात ते पाणी आरोग्यास अत्यंत धोकादायक आहे. मी स्वत: केमिकल प्लँटमध्ये काम करतो मी पण रेझिन बनविलेले आहे. लावलेली भातशेती वाळून जाते. मी सन २०२२ पासून शेती करत नाही. आजुबाजूच्या शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्याचेही उत्तर कंपनी व्यवस्थापनाने द्यावयाला पाहिजे. तुम्ही कच्चा माल कोणता वापरता हे आम्हाला दाखविला नाही. तसेच पाण्याचे कितीही फिल्टर केले तरी ते पाणी पिण्यायोग्य होणारच नाही. कंपनी काही बंद होणार नाही.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी प्रकल्प प्रवर्तक यांनी याचे पूर्णपणे सविस्तर उत्तर द्यावं असे सांगितले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी म्हटले की, तुम्ही रेझिन बनता म्हणजे तुम्ही या कंपनीचे स्पर्धक आहात. पाण्याच्या बाबतीत पाण्यावर पूर्णपणे प्रक्रिया करुन कंपनीबाहेर एकही थेंब पाणी जाणार नाही याची खबरदारी घेतली जाईल. घातक घनकचऱ्याबाबत त्याचं काय करणार आहे, ते कुठं पाठवलं जाईल याची तपशिलवार माहिती सादरीकरणामध्ये दाखविलेलं आहे.

२३) **श्री. श्रीराम दशरथ विसे, रा. दिनकरपाडा, ता. वाडा, जि. पालघर :**
मी कंपनीचा स्पर्धक नसून एक कामगार आहे असे म्हटले. तुम्ही मिक्सर आणि ब्लेन्डींग करणार आहात, इलेक्ट्रीक ब्लेन्डींग म्हणजे तुम्ही बॉयलर व कुलींग टॉवरचा वापर करणार आहात, ते असं होवू शकतं का हे सांगावं.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, त्याच्यामध्ये दोन प्रकारचे उत्पादन आहे. एक सिंथेटिक ऑरगॅनिक केमिकल उत्पादन हे पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसुचनेच्या अंतर्गत येतं आणि दूसर मिक्सींग अॅण्ड ब्लेन्डींग आहे ते पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसुचनेच्या अंतर्गत येत नाही. ज्यावेळी रिअॅक्टर बदलते त्यावेळी रिअॅक्टर धुतली जाते तेंव्हा पाण्याचा वापर होणार आहे.

२४) **श्री. श्रीराम दशरथ विसे, रा. दिनकरपाडा, ता. वाडा, जि. पालघर** :
मी शेती नाहीच करत त्याचं काय असे संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांना प्रश्न विचारले. तसेच ग्राम पंचायतीमध्ये लेखी अर्ज दिले आहे असे म्हटले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी यांनी तुम्ही कधी शेती विभागाकडे तक्रार केली आहे का असे विचारले.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी कंपनीतील सांडपाण्यामुळे भात शेतीचे नुकसान होत असे तुमचे म्हणणे मांडा असे सांगितले व त्याची इतिवृत्तात नोंद घेतली जाईल असे नमूद केले.

२५) **श्री. अनंत पाटील, सहसचिव, पर्यावरण संरक्षण मंच :**
एका ग्रामस्थांनी गावापासून उद्योग किती अंतरावर असावा याबाबत उपस्थित केलेला प्रश्न हे सगळं मंत्रालयात ठरतं आणि परवानगी मिळते असे प्रकल्प प्रवर्तकांने सांगितले. मग मंत्रालयातच सर्व ठरत असेल तर हे सगळं लोक इथे जमलीत ते वेडे आहेत काय? आणि जर मंत्रालयातच सगळं ठरत असेल तर या लोकांच दुसरीकडे कुठेतरी पुनर्वसन करा व यांना खुशाल परवानगी द्या. आज ७०० टन/महिना आहे एवढं त्रास होत आहे, भविष्यात ७००० टन/महिना उत्पादन झाल्यावर किती त्रास होईल याचा विचार करावा. अक्षांश रेखांशमध्ये घेतलेले फोटे दाखविले गेले, तरी सुध्दा पुरावे मागत असाल तर आपली समन्वयक ही भूमिका लोकांना साशंक वाटते आहे असे म्हटले.

दूसरी गोष्ट अशी की, इथे बसलेल्या ८० टक्के लोकांना तांत्रिक शब्द समजत नाही, उर्वरित २० टक्के लोकांपैकी ५ टक्के जाणकार लोकांना याबाबत थोडीफार समजते. असं असताना, इथे उपस्थित सर्व संबंधितांच्या नाकाला एवढी दुर्गंधी येत असताना देखील आमचंच खरं असे कंपनी म्हणत असेल तर या सर्व लोकांचा वेळेचा अपव्यय का? त्यामुळे या कंपनीचे कोणत्याही प्रकारे विस्तारीकरण करण्यात येऊ नये आणि सध्या अस्तित्वात असलेली कंपनीसुध्दा बंद करण्यात यावी अशी सर्व ग्रामस्थांच्या वतीने विनंती केली. हे क्षेत्र एम.आय.डी.सी. मध्ये असल्याचे सांगून कंपनीला परवानगी द्यावयाचेच असेल तर सर्व ग्रामस्थांचे पुनर्वसन करावे आणि सर्व ग्रामस्थांना व्यवस्थित जगू द्यावं एवढीच माफक इच्छा आहे असेही नमूद केले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी या आक्षेपाची नोंद घेण्यात येईल असे सांगितले.

...१०

**२६) श्री. संदिप मधुकर भेरे, रा. दिनकरवाडी, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

कंपनीचे उत्पादन क्षमता ७००० टन / महिना झाल्यानंतर गावाला त्रास होईल किंवा नाही होईल हा वेगळा मुद्दा आहे, परंतु सध्या ७००टन / महिना उत्पादन असताना पाण्याला, हवेला, जमिनीला व गावकऱ्यांना त्रास झालेला आहे किंवा नाही असे विचारले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ अन्वये घेतलेल्या पाण्याच्या, मातीच्या आणि हवेच्या नमुने गोळा करुन मान्यताप्राप्त संस्थेकडून परिक्षण केले असता, परिक्षणाचे अहवाल सुरक्षित मानकाच्या आत असल्याचे निदर्शनास आले आहे.

**२७) श्री. सुनंदा के. रेड्डी, पर्यावरण तज्ञ :**

श्री. रेड्डी इंग्रजी भाषेमध्ये त्यांचा मुद्द मांडण्याचा प्रयत्न केले असता, ग्रामस्थानी मा.अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी यांचेकडे ही जनसुनावणी ग्रामस्थांकरीता असल्यामुळे व ग्रामस्थांना इंग्रजी भाषा समजत नसल्यामुळे त्यांनी मराठी भाषेतच बोलावे असे हरकत घेतले. त्यावर श्री. रेड्डी यांनी भारताचे नागरिक या नात्याने भारतात मला कोणत्याही भाषेत बोलण्याचा अधिकार असल्याचे नमूद केले व बोलू द्यावे अशी विनंती केली.

तद्नंतर संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी सगळ्यांना शांत राहण्याची विनंती केली. श्री. रेड्डी यांनी इंग्रजीत मांडलेला मुद्दा कंपनीमार्फत मराठीत समजावून सांगितली जाईल असे सांगितले.

परंतु ग्रामस्थांना श्री. रेड्डी यांची इंग्रजी समजत नसल्यामुळे त्यांनी बोलू नये आणि प्रकल्पाच्या सभोवतालचे ८ कि.मी. क्षेत्रातील नागरिकांनीच सूचना हरकती मांडावे असे सर्व ग्रामस्थांनी एकत्रितपणे आग्रही मागणी केली.

**२८) श्री. अरविंद वसंतराव देशमुख, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर:**

सन्माननीय प्रकल्पाचे सल्लागार महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे पाणी खराब होत नाही. पण बोअरवेलचे पाणी ४०० फुट खोलीवर गेल्यानंतरही ऑईलयुक्त पाणी मिळतय, त्याच्यामध्ये केमिकल आहे किंवा काय आहे माहिती नाही. फिल्टरचे पाणी सगळे पित नाही. सगळयांकडे पसै आहे असा विषय नाही, रोजगार नाही आम्ही काय करायचं, मग तुम्ही कोणासाठी आले आहात यावर आम्हाल न्याय कोण देणार आहेत याचा खुलासा करावा अशी विनंती केली. तसेच शेतामध्ये या कंपनीचे ऑईल शेतामध्ये येतं आणि शेती नापिक होत आहे. मग आम्ही समस्येला सामोरे जाणारे चुकीचे लोकं आहेत काय?

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी आक्षेपाची नोंद घेतली जाईल असे सांगून पाण्याच्या प्रदूषणाबाबत प्रकल्प प्रवर्तकाने उत्तर द्यावे असे सांगितले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी पाण्याच्या बाबतीत पाण्यावर पूर्णपणे प्रक्रिया करुन कंपनीबाहेर एकही थेंब पाणी जाणार नाही याची खबरदारी घेतली जाईल असे सांगितले.

**२९) श्री. अरविंद वसंतराव देशमुख, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

गेल्या १५ वर्षांपासून कंपनी सुरु असून या १५ वर्षात कोणालाही न्याय मिळालेला नाही. आम्ही काय म्हणून आपलं ऐकावं?

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी आक्षेपाची नोंद घेतली जाईल असे नमूद केले.

**३०) सौ. मिताली मनिश दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा,जि. पालघर :**

मी एक महिला म्हणून सांगू इच्छिते की, कंपनीने सादरीकरण दाखविले ते आम्हालाही समजते परंतु एक माणूस

म्हणून कंपनीच्या मालकांना विचारु इच्छिते की, तुम्ही हे प्रदूषण नियंत्रणाचे पालन करताय का? आता इथे वास येणार आणि पोटात जाणारं प्रदूषित पाणी हे आम्हाला काय देताय? कंपनी ७०० टन/महिना वरुन ७००० टन/महिना क्षमतेवर जाऊत कंपनीची उन्नती करता, पण माझं गाव तुम्ही अधोगतीकडे नेताय हा माझा प्रश्न आहे. एक स्त्री म्हणून मी माझ्या मुलांचं प्रथम विचार करते. आता माझ्या गावाची स्थिती इतकी वाईट आहे, तुम्ही आज आलात. कधीतरी वेळात वेळ काढून आमच्या गावात या आणि राहून बघा, राहू शकता का बघा असे विनंती केली. आपण इथं बसलो आहे इतका उग्र वास येतो, तो तुम्हालाही येतोय, तुम्हीही अनुभवत आहे. आमची शेती हा मुख्य व्यवसाय आहे त्याबरोबर मासेमारी जोडधंदा आहे, शेतीची इतकी वाईट अवस्था आहे की शेतकरी शेती करु शकत नाही. शेतकरी कर्ज काढून शेतीची लागवड करतो आणि पीक येण्याआगेदरच प्रदूषणाने कोलमडतो आहे, कंपनी १५ लोकांच्या रोजगाराच आमिष दाखवत आहात, आम्हाला नाही पाहिजे रोजगार. जर आमची शेती वाचली तर आम्ही शेतकरी म्हणून मानाने जगू. आम्ही आरओ (RO) वापरतो पण सगळयांची तशी परिस्थिती नाही. शासकीय कर्मचारी म्हणून आमच्या मुलाबाळांचा विचार करुन आम्हाला

योग्य तो न्याय द्या अशी विनंती केली. आमचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट होणार असल्याचे लक्षात घेता, ७०० टन/महिना वरुन ७०००/महिना उत्पादन क्षमतेवर अजिबात जाऊ देऊ नका, याsathi आम्हा महिलांचा स्पष्ट विरोध आहे.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी वरील आक्षेपाची नोंद घेतली जाईल असे म्हटले.

**३१) सौ. सुनिता सुदाम दिनकर, दिनकरवाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

आम्ही भाजीपाला, भात शेती लागवड करीत असतो परंतु सन २०१९ पूर्वी ५० पोती भात पिकत होतं, पण आता निव्वळ १० पोती भात पिकतं, शिवाय कडधान्य तर सगळं करपून गेलेलं आहे. हंड्यात पाणी भरले असता, दुधावर कशी साय येते तशी पाण्यावर केमिकलचं थर येते. मागच्या वेळी जयश्री दिनकर आणि मला दोघांनाही खुप त्रास झाला त्यामुळे या कंपनीच्या ७०० टन/महिना वरून ७०००/महिना विस्तारीकरण प्रकल्पास आमचा तीव्र विरोध आहे असे नमूद केले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी वरील आक्षेपाची नोंद घेतली जाईल असे म्हटले.

**३२) श्री. विलास बळीराम भैरे, दिनकर पाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

या कंपनीचे मालक श्री.नारायणजी यांनी आतापर्यंत किती कामगारांना कामाला लावलेत ते सांगावे तसेच सांडपाणी प्रक्रिया करुन त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावावी आणि प्रकल्पाच्या विस्तारीकरणानंतर स्थानिकांना किती रोजगार मिळेल याची माहिती द्यावी अशी विनंती केली. तसेच नारायण शेठ यांनी आजूबाजूच्या कंपन्यांनी एकत्र येऊन प्रक्रिया केलेले सांडपाणी परिसरात न सोडता समुद्रात सोडावे मत व्यक्त केले.

**३३) श्री. नरेश बुधाजी दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

मला अस सांगायचं आहे की, ही कंपनी बंदच करा, कारण याचा एवढा प्रचंड त्रास आहे. तसेच ही कंपनी जर चालू ठेवली तर आम्ही ग्रामस्थांनी ती पेटवून देऊ आणि तीव्र आंदोलन करु यास सर्वस्वी आपण जबाबदार असाल असेही मत व्यक्त केले.

**३४) श्री. मनेश सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर :**

हे पर्यावरण मंडळ ग्रामस्थांच्या विरोधात कंपनीबरोबर समन्वय करण्यासाठी आली आहे काय असे आम्हाला वाटते असे म्हटले. गावकऱ्यांच्या शेती नापिक झाल्या आहेत, पाणी पिण्यायोग्य राहिले नाही, गावकऱ्यांचे आरोग्य २५ टक्के खराब झाले असून गावकऱ्यांच्या एवढ्या तीव्र भावना आहेत असे नमूद करुन तीव्र आंदोलन छेडायची तयारी ठेवा असे ग्रामस्थांना आवाहन केले.

....१२

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी आक्षेपाची नोंद घेतली जाईल असे सांगितले.

३५) **श्री. मनेश सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर** :

ही कंपनी रेड झोन मध्ये हे की ग्रीन झोन मध्ये आहे हे सांगावे. रेड झोनमध्ये कंपनी कशाला असायला पाहिजे असे विचारले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वर्गवारीनुसार ही कंपनी रेड वर्गवारीमध्ये असून ग्रीन झोन व रेड झोनशी संबंधित नाही असे सांगितले.

मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, कंपनीचे उत्पादनावरुन त्यांना परवानगी देण्यात येते. कंपनीची केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वर्गवारीनुसार ही कंपनी रेड वर्गवारीमध्ये येते, कंपनीमुळे पाण्याची प्रदूषण, शेती खराब होते या अशा सर्व तक्रारींची नोंद घेण्यात आली आहे. याच्या पेक्षा वेगळं विषय कोणाला सांगायचे आहे असेल तर सांगावे असे आवाहन केले.

३६) **श्री. मनेश सखाराम दिनकर, दिनकरपाडा, कुडुस, ता. वाडा, जि. पालघर** –

ही कंपनी जनसुनावणी मध्ये सांगितल्याप्रमाणे वागणूक केली नाही तर, आम्ही आंदोलन करु हे आपणास मान्य आहे काय असे मा.अध्यक्षांना विचारले.

तद्नंतर मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी लोकशाहीनुसार तो आपला अधिकार असेल असे नमूद केले. तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ व पर्यावरण संरक्षण नियम १९८६ अंतर्गत पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसूचना २००९ च्या अनुषंगाने या ठिकाणी जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती. या जनसुनावणीची नोटीस प्रसिध्द केल्यापासून म.प्र.नि.मंडळाकडे ई-मेल द्वारे प्राप्त झालेल्या २ सूचना प्राप्त झाल्या आहेत. तसेच आज या ठिकाणी जवळजवळ १५ वक्ते काही जण दोनदा तिनदा बोलले आहेत व ग्रामपंचायतीकडे आलेल्या तक्रारी सुध्दा या सोबत जोडून त्यांचाही इतिवृत्तामध्ये समावेश करण्यात येईल असे सांगितले.

जनसुनावणीमध्ये लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, ग्रामस्थ, व्यवसायिक, पर्यावरण तज्ञ सहभागी झाले होते आणि त्यांनी प्रकल्पाच्या संदर्भात अपेक्षा व आक्षेप व्यक्त केले. मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर व जनसुनावणी समितीचे सदस्य, प्रकल्प प्रवर्तक यांचेकडून लोकप्रतिनिधी व गावकरी यांचा पर्यावरणविषयक बाबींचा विरोध, सूचना, अपेक्षा इत्यादींबाबतची नोंद घेतली आहे. शेवटी मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी शांततेच्या मार्गाने सुनावणीत सहभाग घेऊन आपले मत नोंदविल्याबाबत सर्व उपस्थितांचे आभार मानून जनसुनावणीची प्रक्रिया संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**डॉ.सीमा उ दळवी**
समितीचे संयोजक आणि
उप-प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, म.प्र.नि.मंडळ

५|२०२१
**(श्री. जयवंत हजारे)**
समितीचे सदस्य आणि
प्रादेशिक अधिकारी, कल्याण म.प्र.नि.मंडळ

**(श्री. सुभाष भागडे)**
समितीचे अध्यक्ष आणि
अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर